# कै. दादा व श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय

ग्रामीण भागातील मुला-मुलींना शिक्षण सहज उपलब्ध व्हावे या हेतूने सन १९७१ साली श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाची सुरुवात झाली. सुरुवातीच्या काळात विद्यार्थी संख्या माफक होती. पण दादांनी घेतलेल्या निर्णयांनी महाविद्यालयाच्या विद्यार्थी संख्येत लक्षणीय वाढ होत गेली. आज महाविद्यालयात चार हजारहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असून कला, वाणिज्य, विज्ञान, बी.सी.ए, शाखांसह शिवाजी विद्यापीठाचे ११ कोर्सेस सुरु आहेत. कै. दादांनी श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील शैक्षणिक कामकाजाकडे जातीने लक्ष दिले.

## शिकविण्याचे काम प्रामाणिकपणे करा !

**- डॉ. डी. आर. मोरे**, माजी प्राचार्य

मी जून १९८० साली श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात इंग्रजी विषयाचा शिक्षक म्हणून रुजू झालो. दादांनी शहाजी महाविद्यालय दसरा चौकात असलेल्या शाहू मराठा बोर्डिंगमध्ये भरविण्याचे ठरवले आणि संपूर्ण महाविद्यालयाचे शैक्षणिक व कार्यालयीन कामकाजाची सुरुवात बोर्डिंगमध्ये सुरु झाली. दादा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विचार करून शहाजी महाविद्यालयासाठी स्वतंत्र इमारत बांधण्याचे ठरविले. आर्थिक प्रश्न निर्माण झाला. कारण संस्थेकडे फक्त कला आणि वाणिज्य या



महाविद्यालयातील नवीन संगणकाची पाहणी करताना दादा...

दोनच शाखा होत्या आणि त्यातील उत्पन्न असे काहीच नव्हते.

त्यावेळी मला असे वाटले की आपण येथे काम करतो, पगार घेतो, मग आमची जबाबदारी काहीच नाही का? मी स्वतः काही सहकाऱ्यांना घेऊन दादांना भेटलो, आमची मदत करण्याबाबत त्यांच्याशी बोललो. दादांनी सर्व शांतपणे ऐकून घेतले. त्यांना फार बरे वाटले. निधी संकलन करण्यासाठी त्यावेळी काही पावती पुस्तके छापली होती. त्याची मागणी आम्ही केली. परंतु दादांचा दृष्टिकोन वेगळाच होता. ते आम्हाला म्हणाले, 'हे पहा, तुम्ही येऊन तुमचा सकारात्मक विचार बोलून दाखविला तेवढे बस्स. अंबाबाईच्या कृपेने आमचे काम पूर्ण होईल आणि त्यासाठी लागणारा निधी आम्ही गोळा करतो. तुम्हाला आम्ही शिकविण्याच्या कामासाठी नेमलंय. तेवढं काम प्रामाणिकपणे करा. पैशांची चिंता तुम्ही करू नका.' दादांच्या या विचारांनी आमच्या अंगावर रोमांच उभे राहिले.



नेत्रहीन विद्यार्थ्यांचे कौतुक करताना दादा...

## बंधुभाव व समाजाविषयीची कळकळ

**- प्रा. दिलीप पंगू**

१९७४ च्या जून महिन्यात श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, शालिनी पॅलेस रंकाळा परिसर येथे सुरू झाले खरे, पण विद्यार्थ्यांची संख्या फारच कमी होती. दादांच्या सूचनेनुसार पहिली २-३ वर्षेआम्ही ३-४ प्राध्यापक करवीर तालुक्यातील सर्व शाळांना प्रा. चंद्रकुमार नलगे यांच्या नेतृत्वाखाली भेट देत असू व शालांत परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या मुला-मुलींना शहाजी महाविद्यालयात पाठविण्याची विनंती करीत असू. दादा आम्हाला ड्रायव्हरसह जीप द्यायचे व आस्थेने विचारपूस करायचे. आम्ही 'दादांच्या महाविद्यालयातील प्राध्यापक' असल्याने प्रतिसाद चांगलाच मिळत गेला. शहाजी महाविद्यालय शालिनी पॅलेसमध्ये सुरु झाल्यानंतर झालेल्या एका 'स्टाफ मिटिंग'मध्ये दादांनी केलेले भाषण अद्यापही माझ्या लक्षात आहे. कोणत्याही वर्गातील प्रवेशासाठी आपण विद्यार्थ्यांना टक्केवारीची अट ठेवायची नाही हे त्यांनी सांगितले. आपल्याकडे गरिबांची व कष्टकऱ्यांची मुले येणार. अगदी दारू गाळणाऱ्यांची मुले येणार. पण त्यांनी तुम्ही चांगले शिकवले पाहिजे' असे त्यांनी सांगितले. दादा त्यांच्या परिस्थितीमुळे फारसे शिकलेले नव्हते. त्यांच्याकडे पदवी नव्हती. प्रसंगी आपण कपिलतीर्थ मंडईत भाजी विकली आहे, असे ते जाहीरपणे सांगत. पण त्यांना चांगली पुस्तके वाचण्याचा नाद होता. आपण वाचलेल्या पुस्तकां-बाबत ते डॉ. कटांबळे, प्रा. ठक्कर, डॉ. जयसिंगराव पवार इत्यादी प्राध्यापकांशी चर्चा करीत. डॉ. कटांबळे यांच्या भाषणात बरेचदा संस्कृत सुभाषितांचा वापर असे. त्यावेळी व्यासपीठावर बसलेले दादा मान डोलवून दाद देत असत.





श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात प्रदर्शनाचे उद्घाटन करताना दादा...



संस्थेतील स्वातंत्र्यदिन समारंभात मानवंदना स्वीकारताना दादा...

## दूरदृष्टीचे समंजस नेते

**- प्रा. सुधाकर मानकर**

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाची स्थापना १९७१ मध्ये झाली. 'शहाजी' प्रारंभी रंकाळा तलावाच्या काठावरील शालिनी पॅलेसमध्ये भरत होते. विद्यार्थी संख्या वाढल्यामुळे त्या राजवाड्यातील खोल्यांची संख्या कमी पडू लागली. आर्टसकडील व कॉमर्सकडील एकूण १२ स्पेशल विषय व सर्व वर्गांच्या स्वमालकीच्या तुकड्यांमुळे नव्या इमारतीची गरज तीव्रतेने भासली होती. त्या पार्श्वभूमीवर संस्थेच्या स्वमालकीच्या दसरा चौकातील जागेवर 'शहाजी'साठी नवी इमारत बांधण्याचा दादांचा दूरदृष्टीचा निर्णय सुद्धा धाडसीच होता. पस्तीस खोल्यांच्या तीन मजली वास्तूसाठी पायाभरणीपासून इमारत पूर्ण होईपर्यंत कुठेही निधी कमी पडू दिला नाही. 'शहाजी'च्या भव्य वास्तूसाठी एकहाती निधी उपलब्ध करून देण्याचे सर्वस्वी श्रेय दादांचेच. कोणाकडूनही कसलीही देणगी न घेता 'शहाजी'साठी भव्य वास्तू उभारण्याचा संकल्प दादांनी स्वबळावर तडीस नेला ! देणग्या गोळा करण्याचा काही संचालकांनी मांडलेला प्रस्ताव दादांनी फेटाळला होता, हे सुद्धा इथे नमूद करणे आवश्यक आहे. त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !



महाविद्यालयातील शिवाजी ग्रंथालयाच्या उद्घाटनप्रसंगी दादा !

## शब्द पाळणारे दादा !

**- प्रा. र. घ. वराडकर**

कै. श्रीपतराव बोंद्रे (दादा) यांच्याकडे श्री शाहू शिक्षण संस्थेचे धुरिणत्व आले आणि संस्थेचा कायापालट झाला. दसरा चौक या ऐतिहासिक महत्त्वाच्या परिसरात एक शैक्षणिक संकुलच उदयाला आणि नावारूपाला आले. १९८० साली शालिनी पॅलेसमधून महाविद्यालयाचे स्थलांतर श्री शाहू मराठा बोर्डिंगच्या परिसरात झाले. दोनएक वर्षात महाविद्यालयासाठी इमारत बांधण्याचे ठरले. बांधकाम झाल्यानंतर दादा एकदा पाहणी करण्यासाठी आले. सोबत त्यावेळचे प्राचार्य डॉ. कटांबळे आणि मी होतो. आम्ही काही सूचना केल्या. त्या त्यांनी ऐकून घेतल्या. पण जाताना त्यांनी बांधकाम करणाऱ्यांना सूचना दिली की इमारतीच्या तीन मजल्यांपैकी प्रत्येक मजल्यावर शाहू महाराज, राजाराम महाराज आणि श्री शहाजी महाराज यांचे पुतळे उभारा. त्यांच्या माझ्यासमोर झालेल्या या कृतीतून छत्रपतींच्या घराण्याविषयीची त्यांची निष्ठा दिसून आलीच, पण त्याचबरोबर छत्रपती हे या परिसराच्या विकासाचे आद्य प्रवर्तक, या ठिकाणी जे काही घडते आहे त्याबद्दल छत्रपतींचे आपण कृतज्ञ राहिले पाहिजे ही सुद्धा भावना होती. कै. दादांच्या स्मृतीला विनम्र प्रणाम !



भित्तीपत्रकाचे उद्घाटन करताना दादा...

## सर जात काय विचारता ...

**- प्रा. अमर भगवानराव शेळके**

कै. आदरणीय दादांचे नाव काढल्याबरोबर मला माझ्या मुलाखतीचा दिवस आठवतो. शहाजी महाविद्यालयात भूगोल विषयाच्या शिक्षक भरतीसंदर्भात मुलाखती सुरु होत्या. आदरणीय दादा, प्राचार्य कटांबळेसो आदी मान्यवर मुलाखत घेत होते. मी त्यांच्यासमोर गेलो. मला वेगवेगळे प्रश्न विचारले जात होते. आकस्मात प्राचार्य कटांबळे सरांनी तुमची जात कोणती ? असा प्रश्न विचारला. मी काही बोलण्याच्या अगोदर दादा म्हणाले, 'सर तुम्ही त्याला जात काय विचारता ? तो धनगर जातीतला आहे.' दादांनी एका क्षणात पुढची माहिती आपणच सांगितली. 'सर हा आमचे कार्यकर्तेभगवानराव शेळके यांचा मुलगा... आता आणि काय विचारायचे आहे काय ?' आणि तिथंच माझी मुलाखत संपली. आज मी संस्थेत काम करीत आहे. दादा हयात असेपर्यंत त्यांच्याशी अनेकवेळा संबंध आला. पण मला मुलाखतीचा प्रसंग आजही जसाच्या तसा आठवतो.

## वाचकाशी बोलल्यागत वाटतंय !

**- प्रा. दिनेश डांगे**

माजी कृषि राज्यमंत्री कै. श्रीपतराव बोंद्रदादा हे आमच्या श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन. त्यांच्याबद्दल आम्हा सर्व कर्मचाऱ्यांच्या मनात कमालीचे प्रेम आणि आदर होता. संस्थेच्या आम्हा कर्मचाऱ्यांना दादांकडे जाण्याचा कधी फारसा प्रसंग यायचा नाही. तथापि, कधी प्रसंग आलाच तर दादांशी मनमोकळे बोलणे व्हायचे. त्या काळात माझे वृत्तपत्रीय लेखन जोमात चालू होते. पुढारीमधील 'पहिला चहा' गाजत होता. त्यातच मला तरुण भारतने आमंत्रित केले. तरुण भारतमध्ये 'खुमासदार' हा दैनिक स्तंभ वाचकांच्या पसंतीस उतरला होता. परंतु 'रामा शिवा गोविंदा' हे अस्सल कोल्हापुरी भाषेतील ग्रामीण शैलीतील साप्ताहिक सदर तुफान गाजत होते. जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी सर्व स्तरातील वाचक त्याची आतुरतेने वाट पाहत. दादांना सर्व दैनिके वाचाविशी वाटत. म्हणून त्यांना ती वाचून दाखविण्याचे काम दादांचे आवडते आणि आमच्या महाविद्यालयातील त्यावेळचे मराठीचे प्राध्यापक व विद्यमान प्राचार्य प्रा. डॉ. राजेखान शानेदिवाण करत. त्यावेळी 'रामा शिवा गोविंदा' हे सदर दादांना खूप आवडायचे. त्यांनी प्रा. शानेदिवाण यांना विचारले, 'अरे कोण रे हा खाशाबा मास्तर?' दिवाणसर म्हणाले, 'आपल्याच महाविद्यालयातील प्रा. दिनेश डांगे लिहितात.' लगेच मला बोलावणे धाडण्यात आले. पहिल्यांदाच मी दादांच्यासमोर हजर होत होतो. मी थोडा वेळ बसलो. धाडस करून मी दादांना विचारले, 'दादा कसं काय वाटतं माझं लिखाण ?' त्यावर दादा म्हणाले, 'अपील नाही ! वाचकाशी बोलल्यागत वाटतंय !' दादांची ही दाद मी आयुष्यभर जपून ठेवली आहे.



कॅरम स्पर्धेचे उद्घाटन करताना दादा

# कै. श्रीपतराव शंकरराव बोंद्रेदादा जन्मशताब्दी

**कै. श्रीपतराव बोंद्रेदादा यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कै. दादांनी नेहमीच गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आग्रह धरला. स्वाभाविकपणे श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयानेही जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने विद्यार्थी व्यक्तिमत्व विकासाचा हेतू मनात ठेवून कार्यक्रमांची आखणी केली.**

## कै. श्रीपतराव बोंद्रे (दादा) जन्मशताब्दी वर्षास प्रारंभ




कै. श्रीपतराव बोंद्रे (दादा) यांचे जन्मशताब्दीनिमित्त स्व. दादांच्या प्रतिमेचे पूजन जेष्ठ प्राध्यापक श्री. निवास कुंभार व सेवक श्री. बाबुराव नलवडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी श्री. निवास कुंभार मनोगत व्यक्त करताना.



कै. श्रीपतरावजी बोंद्रेदादा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त दि. २८ डिसेंबर २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय कॅडेट कॉर्प यांचेवतीने छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय, कोल्हापूर यांचे सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये २ विद्यार्थिनींसह २७ विद्यार्थी व प्राध्यापकांनी रक्तदान केले.

## कै. बोंद्रेदादांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने जिल्हास्तरीय निबंध व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन







उद्घाटन : हस्ते सौ. अश्विनी धोत्रे, सभापती, करवीर पंचायत समिती, जि. प. सदस्य श्री. राहूल पाटील, श्री. सुभाष रजपूत व अन्य मान्यवर. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांचे हस्ते वक्तृत्व स्पर्धेचे बक्षिस स्वीकारताना कु. तेजस्विनी संजय पांचाळ. तिसऱ्या छायाचित्रात स्पर्धेमध्ये सहभागी झालेले विद्यार्थी-विद्यार्थीनी.



कै. श्रीपतराव बोंद्रे दादा यांच्या पुण्यतिथीनिमित्त दादांच्या पुर्णाकृती पुतळ्याला अभिवादन करताना संस्थेचे अध्यक्ष मा. मानसिंग बोंद्रे, मानद सचिव मा. विजयराव बोंद्रे, माजी नगरसेवक इंद्रजीत बोंद्रे व अन्य मान्यवर.



कै. दादांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने 'महिला दिनादिवशी' कर्तृत्ववान महिला पत्रकारांचा सत्कार आयोजित करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्या प्रियंका पाटील यांनी मुलींना मार्गदर्शन केले.




'शहाजीयन' या माजी विद्यार्थी संघातर्फे दादांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांच्याकडे तिजोरी प्रदान करताना अध्यक्ष बाबासाहेब पाटील, आसुर्लेकर व माजी विद्यार्थी.



कै. श्रीपतराव बोंद्रे दादा यांच्या पुण्यतिथीदिनी मनोगत व्यक्त करताना गडहिंग्लज येथील डॉ. घाळी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. शिवाजीराव भुकेले

❊ **संशोधन प्रकल्प :** शिवाजी विद्यापीठ, अग्रणी महाविद्यालय संशोधन प्रकल्प अंतर्गत "कोल्हापूरच्या विकासात माजी राज्यमंत्री स्व. श्रीपतराव बोंद्रे (दादा) यांचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास' या विषयावरील संशोधनपर प्रकल्प शिवाजी विद्यापीठास सादर करण्यात आला. हा प्रकल्प श्री. महेश कुंभार, श्री. आकाश व्ही. पाटील, श्री. निखिल बा. मगदूम व श्री. प्रवीण बी. जाधव या विद्यार्थ्यांनी पूर्ण केला असून त्यांना प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण व ग्रंथपाल डॉ. पी. बी. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

❊ **प्रश्नमंजुषा स्पर्धा :** कै. दादांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी यांच्यासाठी प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये ८६१ स्पर्धक सहभागी झाले होते. या उपक्रमामुळे कै. दादांचे जीवन व कार्य अनेक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याला मदत झाली.

**संपादकीय.....**



'शहाजी वार्ता'चा विशेषांक प्रसिद्ध होत आहे. कै. श्रीपतराव शंकरराव बोंद्रेदादा यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने कै. दादांच्या जीवनकार्याचा परिचय व्हावा या हेतून सदर अंकाची मांडणी केली आहे. या अंकामध्ये दादांसंदर्भातील आठवणींसोबत त्यांच्या जीवनकार्याचा आढावा व त्या अनुषंगाने छायाचित्रेही प्रकाशित होत आहेत. आपल्या महाविद्यालयामध्ये जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याचाही आढावा या निमित्ताने घेण्यात आला आहे. या अंकाच्या निर्मिती प्रक्रियेमध्ये अनेकांचे योगदान आहे. सर्वांचे मनःपूर्वक आभार !

**संपादक मंडळ**

- संपादक : प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण
- कार्यकारी संपादक : प्रा. अरुण कांबळे
- सहसंपादक : डॉ. पी. बी. पाटील

• सदस्य •

प्रा. एस. एच. कांबळे, प्रा. पी. बी. पाटील, प्रा. व्ही. एच. पुंदीकर, प्रा. सागर चरापले, श्री. आर. जे. भोसले, श्री. जी. ए. पाटील, टंकलेखक

❊ 'शहाजी बुलेटिन' या त्रैमासिकाचे प्रकाशन श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर येथून करण्यात आले. ❊ 'शहाजी बुलेटिन'या त्रैमासिक अंकातील मजकुराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
❊ फक्त खासगी वितरणासाठी. वर्ष : तिसरे, त्रैमासिक अंक १०वा (जुलै ते डिसेंबर २०२०) ❊ मुद्रक : प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर.